# 'पाटकर-वर्दे'चे सायबर वॉरियर डिजिटल आव्हानांसाठी सज्ज!




◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

पाटकर-वर्दे कॉलेजच्या सायबर सिक्युरिटी क्लबने नुकतेच पुण्यातील क्विक हील फाऊंडेशन मुख्यालयात आयोजित प्रतिष्ठित सायबर सिम्पोजियम प्रशिक्षण कार्यक्रम २०२५-२०२६ मध्ये उत्साहाने भाग घेतला. हा कार्यक्रम क्लबच्या सायबर सुरक्षा जागरूकता आणि विद्यार्थी नेतृत्वाला तल्लीन करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.

प्राध्यापक समन्वयक निकिता मडवळ यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी शिष्टमंडळातील मंजिल बोर्ले (प्रेसिडेंट), सोनी महतो (सेक्रेटरी), मोहम्मद अर्श आलम शेख (ॲक्टिव्हिटी डायरेक्टर) आणि भूमिका पटेल (मीडिया डायरेक्टर) हे चार गतिमान क्लब अधिकारी सहभागी होते. सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा या कार्यक्रमानंतर झालेल्या इंडक्शन सत्रात डिजिटल सुरक्षा आणि सायबर सुरक्षा या महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला.

अधिकाऱ्यांनी मार्गनिहाय प्रशिक्षण घेतले, प्रकल्प नियोजन उपक्रमात भाग घेतला, त्यांचे विचार सादर केले. तसेच सगळ्या प्रशिक्षकांनी मिळून बाकी सर्व विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्गदर्शन केले. त्यानंतर क्विक हिल फाऊंडेशनच्या अध्यक्ष अनुपमा काटकर यांच्या हस्ते अधिकृत क्लबची स्थापना करून विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन वाढवले. या कार्यक्रमात ज्ञानाची देवाणघेवाण करण्यात आली असून पाटकर वर्दे कॉलेजच्या सक्रिय सहभागामुळे डिजिटल आव्हानांसाठी आणि समाजात अर्थपूर्ण योगदानासाठी विद्यार्थी सज्ज असल्याचे दिसून आले.